# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/११/२०२४ (शनिवार) दुपार**

---

**पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील उपरवाही कळमेश्वर परिसरात**
**अवैधरित्या मोहाफुल गावठी दारूची विक्री करणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही**

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. ०१/११/२०२४ रोजी पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील मौजा खैरी उपरवाही रोडचे चौकामध्ये मोहाफुल गावठी दारूची विक्री करणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. **आरोपी नामे– संदीप मारोती मौजे, वय २१ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ उपरवाही कळमेश्वर** हा मोहाफुल गावठी दारू बाळगुन विक्री करतांना मिळुन आला. दारूबाबत आरोपीची अंगझडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून ०८ प्लास्टीक डबक्या ज्यामध्ये ५०लिटर व ०५ मोठे टयुब ७० लिटर क्षमतेचे दोन्ही साईडने तोंड बांधलेले ०८ प्लास्टीक डबक्याचे झाकए उघडलेले ०५ मोठे टयुबचे दोन्ही साईडने तोंड सोडलेल एकुण अंदाजे ७५० लिटर गावठी मोहफुल हातभटटी दारू तसेच ०५ लिटर क्षमतेचे प्लॅस्टीकची डबकी असा एकुए ७५५ लिटर मोहफुला दारू प्रति लिटर १०० रू प्रमाणे एकुण ७५,५००/– रू चा मुद्देमाल मिळून आल्याने आरोपी विरुद्ध कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**प्राणांतिक अपघात**

पोस्टे बेला अंतर्गत दिनांक ०१/११/२०२४ रोजी चे २१/४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– प्रफूल शामराव गेडाम वय २० वर्ष रा गिरड त. समूद्रपूर जि वर्धा हे त्याचा भाऊ सचीन गेडाम व सचीन चौधरी सह, सचीन चौधरी याची ॲक्टीवा मोसा क्र एम एच ४९ बि डी ३८२७ ही सचीन चौधरी चालवत गिरड वरून सिर्सीला जात असता सिर्सी शिवारात एक ट्रक समोरून आल्याने यातील मृतक सचीन चौधरी हा गाडी चालवीत असल्याने ट्रकचे अप्पर लाईट त्याचे डोळयावर पडल्याने व ट्रकने त्याचे मोसाला कट मारली. सचीन चौधरीचे गाडीवरील नियंत्रन सूटून मोसा रोडचे खाली नाल्यात उतरून झाडाला ठोकली त्यामूळे त्या तिघांना जबर मार लागून जखमी झाले व नागपूर मेडीकल कॉलेज येथे उपचारा दरम्यान सचीन गेडाम व सचीन चौधरी मरण पावले व फिर्यादी हा सदर अपघातात जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे बेला येथे अज्ञात ट्रक चालकाविरूद्ध कलम १०६ (१),१२५,२८१ भा.न्या स सहकलम १८४, १३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला असुन अज्ञात ट्रक चालकाचा शोध बेला पोलीस घेत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर